महाराष्ट्र शासन - सार्वजनिक आरोग्य विभाग
राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय
डॉ. नायडू रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे-४११००१.

उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ)
तथा निबंधक विवाह मंडळ व विवाह
(विभागस्तरीय समन्वय)
महाराष्ट्र राज्य, पुणे

कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०
वि.नों. विभाग ☎ :- ०२० - २६०५८६१०
ना.नो.प विभाग :- ०२० - २६०५८२९२
ई-मेल :- mahvivah@gmail.in
संकेतस्थळ :- arogya.maharashtra.gov.in

आरोग्य सेवा जा.क्र.आमाजिआ/कक्ष-८२/वि.नों/मयत प्रकरण/

दिनांक :-०२/११/२०१८.

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद .......... सर्व.

विषय :- विवाह नोंदणी करताना पती किंवा पत्नी यापैकी एखादी व्यक्ती मयत असल्यास अशा प्रकरणामध्ये मार्गदर्शन मिळणेबाबत.

संदर्भ :- शासनाचे पत्र क्रमांक जमृनो२०१६/२८६४/प्रक्रं.६९७/कु.क दि. २५/१०/२०१८.

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये विवाह नोंदणी करताना पती किंवा पत्नी यापैकी एखादी व्यक्ती मयत असल्यास अशा प्रकरणामध्ये मार्गदर्शन मिळणेबाबत ब-याच जिल्हयांकडून विचारणा केलेली होती, याबाबत शासनाकडून मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. सदरचे दिनांक २५/१०/२०१८ चे पत्र सोबत जोडण्यात आलेले आहे.

आपणास कळविण्यात येते की, आपण आपल्या कार्यक्षेत्रातील ग्रामिण व शहरी विभागातील विवाह निबंधकांना शासनाच्या उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार कार्यवाही करण्याबाबत कळवावे.

उपसंचालक आरोग्य सेवा (आ.मा.जि.आ.) तथा
निबंधक, विवाह मंडळ व विवाह नोंदणी
(विभागस्तरीय समन्वय),
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत सविनय सादर : १) मा.आयुक्त, आरोग्य सेवा,तथा प्रकल्प संचालक राष्ट्रिय आरोग्य अभियान मुंबई.
२) मा. संचालक, आरोग्य सेवा तथा निबंधक, विवाह मंडळ व विवाह नोंदणी (राज्यस्तर), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत सस्नेह : उपसंचालक आरोग्य सेवा, आरोग्य मंडळ, ........... (सर्व) २/ त्यांना विनंती की त्यांनी त्यांचे मंडळातील सर्व जिल्हयांतील विवाह निबंधकांना कळविण्यात यावे, यासाठी पाठपुरावा करावा.

महाराष्ट्र शासन

क्रमांकः-जमृनो२०१६/२८६४/प्र.क्र.६९७/कु.क.
सार्वजनिक आरोग्य विभाग,
जी.टी.संकूलइमारत,१०वा मजला,
मुंबई-४०० ००१.
दिनांक:-२५.१०.२०१८

प्रति,

संचालक,आरोग्य सेवा
तथा विवाह निबंधक(राज्यस्तर)
मुंबई.

विषय :- विवाह नोंदणी करताना पती किंवा पत्नी यापैकी एखादी व्यक्ती मयत असल्यास अशा प्रकरणांमध्ये मार्गदर्शन मिळण्याबाबत
संदर्भ :- आपल्या कार्यालयाचे जा.क्र.संआसे/कक्ष-१८/विनों/जोडीदार मयत/१२९८-९९/१७, दिनांक १९/०५/२०१७ चे पत्र

महोदय,

उपरोक्त विषयावरील आपले संदर्भीय पत्र कृपया पहावे.

२. विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम, १९९८ व महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम,१९९९ मधील तरतुदी विशेषत: ६.७(१)(२) कडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. विवाह नोंदणी करण्यापुर्वी संबंधीताचा विवाह झाला असल्याची खातरजमा करुन विवाह नोंदणी करण्यास विवाह निबंधक सक्षम प्राधिकारी आहेत. विवाह निबंधकांनी उपरोक्त कायद्यातील तरतुदी व नियम यांनुसार कार्यवाही करणे अपेक्षित आहे. तरी महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम १९९९ मध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता नसल्याचे आपणास कळविण्यात येत आहे.

आपली विश्वासु,

(उज्वला अ. रणसिंग)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-१. उपसंचालक, आरोग्य सेवा तथा विवाह निबंधक (विभागस्तर), आमाजिआ,पुणे
2. निवडनस्ती

D:\Kishor Nanavare\Marriage Registration\प्र.क्र.६९७-२०१६ विवाह नोंदणी करण्यापुर्वी पतीपत्नीह मृत्यु पावल्यास.Docx